नियमीत दिवाणी दावा क्रमांक १५०/२०१७ निशाणी ५ वरील आदेश

सौ. राहीन शहाजहान तहसिलदार – वादी

विरुध्द

श्री. आप्पासो गंगाराम वाघमारे (महार), व. – प्रतिवादी

१. प्रस्तुतचा दावा कायम मनाईचा असून प्रस्तुतचा अर्ज हा वादीने, प्रतिवादींनी दावा मिळकतीतील त्याचे कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करु नये म्हणून तात्पुरत्या मनाईसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे आहे की, दावा मिळकत ही मूळ श्री सखाराम धोंडी पाटील यांच्या मालकी वहीवाटीची होती. त्यांनी ती ताराबाई पाटील व आक्काबाई पाटील यांना अ. नं. १२९६ दि. ०३/१२/१९५६ रोजीच्या पोटगीपत्राने दिली. सखाराम धोंडी पाटील यांनी केलेल्या अ. नं. ११५६ दि. २७.०९.१९७५ चे मृत्युपत्राप्रमाणे सखाराम यांचे पश्चात दक्षिण बाजूची अर्धी जमीन आक्काबाई व उत्तर बाजूची अर्धी जमीन ताराबाई मालकी हक्काने उपभोगू लागल्या. आक्काबाई हिने तिच्या मालकीची गट नं. ९८७ मधील दक्षिणेकडील अर्धा हिस्सा तिचा भाऊ बाबासाहेब कृष्णराव पोळ यांना अ. नं. २१२२ दि. १९.०६.१९७९ च्या मृत्युपत्राने दिला. त्यानुसार फेरफार नं. ६१८ प्रमाणे तो दक्षिण बाजूच्या अर्धा हिश्शाचा मालक झाला.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, बाबासाहेब पोळ हे परगांवी असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादीं दावा जमीनीत वहीवाटीचा प्रयत्न करु लागले. तसेच ते दावा मिळकतीमध्ये कूळ असल्याचे बतावणी करु लागले. त्यांनतर प्रतिवादींनी महसूल न्यायाधिकरण व उच्च न्यायालयामध्ये अपीले दाखल केली होती. परंतू ती मान्य झाली नाहीत. सन २००३ चे

कब्जेपट्टीपासून दावा जमीनीत बाबासाहेब पोळ यांची कब्जे वहीवाट होती. वादीने बाबासाहेब पोळ यांच्या दक्षिणेकडील क्षेत्रापैकी दावा मिळकत अ.नं. ५१ ता. ०५.०१.२०१६ रोजी नोंद दस्ताने खरेदी केली. त्याप्रमाणे फेरफार नं. ६०९० ने त्यांची नांवे सातबारा पत्रकी नमूद झाली. तसेच दावा मिळकतीमध्ये त्यांची कब्जेवहीवाट आहे. प्रतिवादींनी ता. १९/०५/२०१७ रोजी दावा मिळकतीमध्ये घूसून दांडगाव्याने कब्जा घेणेचा प्रयत्न केला. तसेच प्रतिवादीं वारंवार दावा जमीनीमध्ये वादीला अडथळा करत आहेत. सबब प्रतिवादींनी तिचे कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करु नये म्हणून तुर्तातुर्त मनाई आदेश व्हावा अशी तिने विनंती केली आहे.

४. प्रतिवादींनी निशाणी १२ कडे म्हणणे देवून अर्जास तिव्र विरोध केला आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, मूळ मालक सखाराम धोंडी पाटील यांनी कधीही शेती केलेली नव्हती. शेती ते कुळामार्फत करुन घेत होते. त्यांच्या मिळकतीमध्ये प्रतिवादींचे पूर्वहक्कदार हे कूळ होते व प्रत्यक्ष कब्जे वहीवाट करत होते. तेंव्हापासून सातबारापत्रकी इतर हक्कात सा.कु. म्हणून गंगाराव महार व शिवाप्पा महार कूळ होते. सखाराम पाटील यांनी मिळकत पोटगी म्हणून आक्काताई व ताराबाई यांना हयातीपर्यंत दिली होती. त्या कधीही दावा मिळकत कसत नव्हत्या. त्या पोटगीपत्राप्रमाणे आक्काताई व ताराबाई यांच्या नांवाची सातबारापत्रकी मालकी सदरी चुकीची नोंद केली आहे. पोटगीपत्राने कधीही मालक होवू शकत नाही. त्या नोंदीवर त्यांनी अपील केले आहे. जरी ताराबाई व आक्काताई यांच्या नांवाची नोंद मालकी सदरी झाली असली तरी इतर हक्कात व पिकपाणी सदरी प्रतिवादींचे पूर्वहक्कदारांच्या नावाची नोंद आहे. त्या नोंदीबाबत वादीने कोणत्याही न्यायालयात दाद मागीतलेली नाही.

५. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, बाळासाहेब पोळ यांनी आक्काबाई यांचेकडून करुन घेतलेले मृत्युपत्र आक्काताई हिला ते करण्याचा अधिकार नसल्यामुळे बेकायदेशीर आहे. तसेच वादीने बाबासाहेब पोळ यांचा दावा मिळकतीमध्ये कब्जा नसताना बेकायदेशीररीत्या खरेदीपत्र करुन घेतले आहे. दावा मिळकतीमध्ये वादीचा कब्जा नाही. त्यांना पैशाची आवश्यकता असल्याने त्यांनी डॉ. उदय सावंता चौगुले यांचे वहीवाटीस दिली व सन २००१ पासून त्यांचे नांवे ऊस कारखान्यास गेला आहे. तसेच सन २०१५–२०१६ साली डॉ. उदय चौगले यांचे नावे ऊस पाठवावा व बील त्यांनीच घ्यावे असे संमतीपत्र वादी प्रतिवादी यांनी लिहून दिलेले आहे. त्यावर रविकांत कारदगे व इकबाल अत्तार यांची साक्ष म्हणून सही आहे. दावा मिळकतीचा कब्जा २००३ रोजी बाबासो पोळ यांना दिलेला नाही. सबब त्यांनी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

६. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जाच्या निर्णयाच्या दृष्टीने पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमुद कारणांकरीता नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रथमदर्शी केस वादींच्या पक्षात आहे काय ? | **... होय.** |
| २ | सोईचा समतोल वादींच्या पक्षात आहे काय ? | **... होय.** |
| ३ | तुर्तातुर्त मनाई आदेश पारित न केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे असे वादीं सिध्द् करतात काय? | **... होय.** |
| ४ | आदेश काय ? | .... अंतिम आदेशानुसार |

# <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत....</u>**

७. प्रस्तुत केसमध्ये उभय पक्षकार दावा मिळकतीत स्वतःचा कब्जा असल्याचे कथन–प्रतिकथन करतात. प्रतिवादींनी वादीच्या पूर्वहक्कदारांनाच मालकी येत नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जाच्या दृष्टीने कोणाचा प्रथमदर्शी दावा मिळकतीवर कब्जा आहे व प्रतिवादी म्हणतात तसे वादीच्या पूर्वहक्कदारांना तशी मालकी येते का? हे सर्वप्रथम पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज तुर्तातुर्त मनाई मिळणेसाठी वादीने केला आहे. त्यामुळे दावा मिळकतीवर कब्जा असल्याचे प्रथमदर्शी सिध्द करण्याची जबाबदारी तीच्यावर आहे. तसे प्रथमदर्शी सिध्द करणेसाठी वादीचे काय कथन आहे व त्या अनुषंगे तिने कोणता पुरावा दिलेला आहे ते सर्वप्रथम पाहणे आवश्यक आहे.

८. वादीच्या कथनानुसार दावा मिळकत सखाराम धोंडी पाटील यांच्या मालकी वहीवाटीची होती. ती त्याने त्याची चुलती ताराबाई व ताराबाईची सुन आक्काबाई यांना अ. नं. १२९६ ने दिनांक ०३/१२/१९५६ रोजी पोटगीपत्राने दिली आहे. तो पोटगीपत्राचा कागद प्रतिवादींनीच निशाणी १७/३ व ४ कडे हजर केला आहे. त्यावरुन वादी कथन करतात तसे सखाराम पाटीलने दावा मिळकत ताराबाई व आक्काबाई यांना उपभोगणेसाठी दिल्याचे दिसून येते. त्याबाबत उभय पक्षकारांमध्ये दुमत नाही. त्याप्रमाणे ताराबाई उत्तर बाजूची व आक्काबाई दक्षिणबाजूची जमीन उपभोगू लागले. त्याची नोंदही सातबारापत्रकी झाली.

९. त्यानंतर वादीच्या कथनानूसार आक्काबाई हिने तिच्या मालकीची अर्धा हिश्शाची दक्षिणेकडील जमीन तिचा भाऊ बाबासाहेब कृष्णराव पोळ याला अ. नं. २१२२

दिनांक १९/०६/१९७९ च्या नोंद मृत्युपत्राने दिली. ते मृत्युपत्र वादीने हजर केले नसले तरी प्रतिवादीनेच निशाणी १३/५ कडे हजर केले आहे. त्यावरुन वादी कथन करते तसे आक्काबाईने बाबासाहेबला मृत्युपत्राने गट नं. ९८७ पैकी दक्षिणेकडील अर्धा हिश्शाची मिळकत दिल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. वादीचे कथनानुसार बाबासाहेब त्या मृत्युपत्राने त्या अर्धा हिश्याचा मालक झाला व जमीन उपभोगू लागला. त्याच्या नावाची नोंदही सातबारापत्रकी झाली. त्याचा फेरफार वादीने निशाणी ३/३ कडे हजर केला आहे.

१०. वादीच्या कथनानुसार बाबासाहेब पोळ याने त्याच्या मालकीच्या मिळकतीचा कब्जा प्रतिवादी नं. १ ते ४ यांचेकडून मिळणेसाठी शेतजमीन न्यायाधिकरणाकडे कूळ कायदा कलम ३२ प (२) (ब) प्रमाणे अर्ज केला होता. त्या अर्जातील निकालाची प्रत वादीने निशाणी ३/७ कडे हजर केली आहे. त्यावरुन वादीं कथन करतात तसे यातील प्रतिवादीं नं. १ ते ४ यांच्याकडून निम्म्या मिळकतीचा कूळ कायदा कलम ३२ प (२) (ब) प्रमाणे कब्जा काढून बाबासाहेब पोळ याला देण्याबाबत आदेश झाल्याचे दिसून येते. त्यांनतर प्रतिवादींना कब्जाची नोटीस देवून (निशाणी ३/८) तसा कब्जेपट्टी पंचनामा ( नि. ३/९) करुन बाबासाहेब पोळचे प्रत्यक्ष कब्जेत मिळकत दिल्याचे ( नि. ३/१०–२) प्रथमदर्शी दिसून येते. त्या निर्णयावर नाराज होवून यातील प्रतिवादींनी टेनन्सी अपील नं. १७/२००३ ( नि. ३/१४) चे केले होते. ते अपीलही नामंजूर करुन खालील कोर्टाचा निर्णय कायम केल्याचे व झालेली कब्जेपट्टी योग्य व कायदेशीर असल्याचा त्या अपीलाचे कामी निर्णय (नि. ३/१४) झाल्याचे दिसून येते. त्या अपीलातील निकालावर नाराज होवून यातील प्रतिवादी नं. १ ने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं. २७१/२०१४ चे दाखल केले होते. त्याकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी असे निर्णीत केले आहे की, बाळासाहेब पोळला आक्काताईचा वारस

म्हणून गट नं. ९८७ मध्ये दक्षिणेकडील अर्धा हिस्सा मिळालेला आहे. मूळ जमीन मालकामध्ये वाटप झाल्याचे अभिलेखावर आलेले आहे व बाळासाहेब पोळने त्याचा अर्धा हिश्याच्या कब्जाची मागणी अर्जाद्वारे केली होती त्यामुळे कूळांचे कलम ३२– ग खालील प्रकरण निष्फळ झाले आहे. असे निर्णीत करुन मा. उच्च न्यायालय यांनी ते अपील फेटाळल्याचे निशाणी ३/१६ कडील कागदपत्रावरुन दिसून येते.

११. या पार्श्वभूमीनंतर कूळ म्हणून असणारे प्रतिवादींचे नांव कमी करुन बाबासाहेब पोळचे नावाची तशी महसूल दप्तरी नोंद फेरफार नं. ४०४८ ने करण्यात आल्याचे निशाणी ३/११ व १२ कडील कागदपत्रावरुन दिसून येते. त्या फेरफार व नोंदीवर नाराज होवून यातील प्रतिवादींनी आर.टी. एस. नं. १३७/२०११ चे अपील केले होते. ते अपीलही फेटाळल्याचे निशाणी ३/१३ कडील कागदावरुन दिसून येते.

१२. तसेच वादीने निशाणी ३/४ कडे बाबासाहेब पोळने महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, पुणे यांचेकडे केलेल्या कूळ अपील नं. ८२/१९९६ चे निकालपत्र हजर केले आहे. ते अपील मंजूर करताना बाळासाहेब पोळला मृत्युपत्राने मालकी आलेली आहे असे निर्णीत करणेत आले आहे. त्या अपीलातील निर्णयावर नाराज होवून यातील प्रतिवादी व अन्य लोकांनी रिट पिटीशन नं. १८८१/२००१ चे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केले होते. परंतु तेही फेटाळण्यात आलेचे निशाणी ३/५ कडील कागदपत्रावरुन दिसून येते.

१३. या सर्व कागदपत्रावरुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट पिटीशन नं. २७१/२०१४ व रिट पिटीशन नं. १८८१/२००१ मधील न्यायनिर्णयावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, बाबासाहेब पोळ गट नं. ९८७ मधील दक्षिणेकडील अर्धा हिश्याचा मालक झाला व

त्याप्रमाणे त्याला त्याचे कब्जेत ती मिळकत कब्जेपट्टीने देण्यात आली. तसेच प्रतिवादींचा कूळ म्हणून असणारा हक्क त्यावेळीच संपुष्ठात आला आहे.

१४. वादी कथन करते तसे त्यांनी बाळासाहेब पोळ कडून दावा मिळकत दिनांक ०५/०१/२०१६ च्या रजिस्टर दस्त नं. ५१/२०१६ ने खरेदी केल्याचे निशाणी ३/२० कडील खरेदीपत्रावरुन दिसून येते. त्या खरेदीपत्रामध्ये खरेदीपत्रा दिवशीच दावा मिळकतीचा कब्जा वादीला दिल्याचे नमूद केल्याचे दिसून येते. एकंदरीत या सर्व कागदोपत्री पुराव्यावरुन प्रथमदर्शी असे दिसून येते की, बाबासाहेब पोळला गट नं. ९८७ मधील दक्षिणेकडील अर्धा हिश्याची मिळकत मृत्युपत्राने मिळाली. तिचा कब्जा कब्जेपट्टीने प्रतिवादींकडून तिला मिळाला ( नि. ३/८ ते ३/१०–२). त्यानंतर दिनांक ०५/०१/२०१६ रोजी वादीला दावा मिळकतीचा कब्जा बाबासाहेब पोळ याचेकडून नोंद खरेदीपत्र नं. ५१/२०१६ ने मिळाला. वादीच्या कथनानुसार तेंव्हापासून तिचा दावा मिळकतीवर कब्जा आहे.

१५. वादीने दिलेल्या या सर्व पुराव्यानंतर आता प्रतिवादींनी त्यांचा दावा मिळकतीवर कब्जा असलेबाबत कोणता पुरावा अभिलेखावर दिला आहे ते पाहणे आवश्यक आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार दावा मिळकत कूळ म्हणून त्यांचे ताब्यात असून त्यांनी पैसे घेवून डॉ. उदय सावंता चौगुले यांच्या ताब्यात ती मिळकत दिली. सन २००१ ते २०१५ पर्यंत चौगुले यांनी पिके घेतलेली आहेत. त्यांनतर सन २०१० ते २०१३ सालापर्यंत चंद्रकांत हल्लाप्पा काणे यांचेकडून रक्कम घेवून दावा मिळकत व अन्य मिळकती कब्जेवहीवाटीस दिली होती. या कथनावरुन प्रतिवादी डॉ. उदय चौगुले व चंद्रकांत काणे यांचे मार्फत दावा मिळकतीवर त्यांचा कब्जा असल्याचे सांगत असल्याचे स्पष्ट होते. त्याचे पुष्ठयर्थ प्रतिवादींनी निशाणी १३/१८ ते १३/७६ कडे चंद्रकांत काणे यांच्या नावे गट नं. ९८७ मधून ऊस गेले

बाबतच्या पावत्या हजर केलेल्या आहेत. त्या पावत्या वरुन गट नं. ९८७ मधून चंद्रकांत काणे यांच्या नावे ऊस गेल्याचे दिसून येत असले तरी तो ऊस दावा मिळकतीतीलच गेला आहे हे स्पष्ट होत नाही. कारण प्रतिवादींचेच कथनानुसार चंद्रकांत काणे याला गट नं. ९८७ मधील अन्य मिळकतही कब्जेवहीवाटीस दिली होती व दावा मिळकतही गट नं. ९८७ मधील दक्षिणेकडील एक भाग आहे. त्यामुळे चंद्रकांत काणे यांच्या नावे गेलेला ऊस दावा मिळकतीतीलच आहे हे स्प्ष्ट होत नाही. तसेच त्याबाबत चंद्रकांत काणे यांचे ॲफिडेव्हीटही प्रतिवादींनी घातलेले नाही.

१६. प्रतिवादींनी त्यांचे कथनांचे पुष्टयर्थ नि. १३/७७ ते १३/९६ कडे डॉ. उदय सावंता चौगुले यांचे नांवे गट नं. ९८७ मधून ऊस गेले बाबतच्या पावत्या हजर केलेल्या आहेत. त्या पावत्या वरुन गट नं. ९८७ मधून डॉ. उदय चौगुले यांच्या नावे ऊस गेल्याचे दिसून येत असले तरी तो ऊस दावा मिळकतीतीलच गेला आहे हे स्पष्ट होत नाही. कारण गट नं. ९८७ मधील उत्तरेकडील मिळकतीवर प्रतिवादींची कब्जेवहीवाट आहे. तसेच प्रतिवादींचेच कथनानुसार डॉ. चौगुले यांचेकडे दावा मिळकत सन २००१ ते सन २०१५ पर्यंत व सन २०१० ते २०१३ पर्यंत चंद्रकांत काणे यांच्याकडे कब्जेवहीवाटीस दिली होती. असे असताना एकाच वेळी दोन व्यक्तींच्या कब्जेवहीवाटीस एकच मिळकत कशी देता येईल. तसेच या दोन व्यक्ती मार्फत कब्जा सांगत असताना प्रतिवादींने त्यांचे ॲफिडेव्हीटही अभिलेखावर दिलेले नाही. त्यामुळे प्रतिवादींनी जरी इतर साक्षीदारांचे ॲफिडेव्हीट घातले असले तरी ज्या व्यक्ती मार्फत ते कब्जा सांगत आहेत त्यांचे ॲफिडेव्हीट अभिलेखावर नसल्यामुळे त्याचा विचार करण्याची आवश्यकता नाही. प्रतिवादींनी निशाणी १३ सोबत हजर केलेली काही कागदपत्रे वादीनेही हजर केलेली आहेत. त्याचा ऊहापोह वरती केलेला आहे. प्रतिवादींनी

निशाणी १३ सोबत हजर केलेली इतर कागदपत्रे व फोटोवरुन, प्रतिवादींचा गट नं. ९८७ मध्ये उत्तरेकडील बाजूस कब्जा असल्याने, ती कागदपत्रे व फोटो दावा मिळकतीचीच आहेत हे स्पष्ट होत नाही.

१७. वर नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकतीवर बाबासाहेब पोळ याचा मृत्युपत्राने व त्याचे नंतर वादीचा नोंद खरेदीपत्र नं. ५१/२०१६ ने कब्जा असल्याचे अभिलेखावरील पुराव्यावरुन प्रथमदर्शी सिध्द झाले आहे. याउलट प्रतिवादींनी ज्या व्यक्तींच्या मार्फत दावा मिळकतीवर कब्जा असल्याचे कथन केले आहे त्या व्यक्तींचा पुरावा अभिलेखावर दिलेला नाही, किंबहूना त्यांनी तसे येवून सांगीतलेलेही नाही. तसेच एकाचवेळी दोन व्यक्तींना एकाच मिळकतीचा कब्जा प्रतिवादी कसा देवू शकतात. यावरुनही डॉ. उदय चौगुले व चंद्रकांत काणे यांचे मार्फत दावा मिळकतीवर प्रतिवादींचा कब्जा असलेबाबतच्या कथनावर सांशकता निर्माण होते. तसेच एकदा वादीने तिचा दावा मिळकतीवर कब्जा असल्याचे प्रथमदर्शी सिध्द केल्या नंतर प्रतिवादींनी त्यांचा कब्जा असल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. परंतु प्रतिवादींनी दावा मिळकतीवर त्यांचा कब्जा असल्याचे प्रथमदर्शी सिध्द केलेले नाही. या सर्व बाबींवरुन प्रथमदर्शी केस वादीच्या वतीने असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक २ व ३ बाबत</u>**

१८. दावा मिळकतीवर वादीचा कब्जा असल्याचे प्रथमदर्शी सिध्द झाले आहे. असे असताना प्रतिवादींनीच हजर केलेल्या निशाणी १३/९८, १३/१००, १३/१०४ व १३/१०५ कडील कागदपत्रावरुन प्रतिवादीं वादीच्या कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करत असल्याचे प्रथमदर्शी दिसत आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्णीत केले असतानाही प्रतिवादी

अॅट्रॉसिटी सारखी केस वादीवर करुन व आत्मदहनासारखा ईशारा देवून वादीवर व सरकारी यंत्रणावर दबाव आणु पाहत आहेत या वादीतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादामध्ये प्रतिवादींनीच हजर केलेल्या निशाणी १३/९८, १३/१००, १३/१०४ व १३/१०५ वरुन तथ्य आढळून येते. त्यामुळे सोयीचा समतोल वादीच्यावतीने दिसून येतो. असे असताना जर तुर्तातुर्त ताकीद दिली नाही तर वादीचेच न भरुन येणारे नुकसाण होणार आहे असे दिसून येते. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक २ व ३ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे.

१९. वरील कारणांचा व परिस्थितींचा विचार करता अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. सबब वादप्रश्न क्रमांक ४ बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

अ. अर्ज मंजूर करणेत येतो .

ब. प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील वादीच्या कब्जेवहीवाटीस प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत कोणत्याही प्रकारे स्वतः अगर इतरां मार्फत हरकत व अडथळा करणेचा नाही.

सही/-

दिनांकः २८/०९/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. S.S. Mandarekar, stenographer (L.G.) |
| Name of Court | Jt. Civil Court, J.D.,& J.M.F.C., Kurundwad, Tal. Shirol,Dist. Kolhapur. |
| Date of Dictation | 28/09/2017 |
| Judgment signed by the P.O. on | 28/09/2017 |
| Judgment uploaded on | 29/09/2017 |